कोकण भवन येथील प्रशासकीय इमारतीमध्ये शासकीय कार्यालयांसाठी जागा वाटप करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्र.शाकाजा-१११८/प्र.क्र.१४३/२०१८/२२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक: १ ऑगस्ट, २०१९

<u>प्रस्तावना :-</u>

सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, रायगड व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, बेलापूर यांचे कार्यालयास कोकण भवन इमारतीमध्ये सद्य:स्थितीत रिक्त असलेल्या जागा विचारात घेऊन तसेच, विभागीय आयुक्त कोकण विभाग कार्यालयाकडे जागेची मागणी करण्यात आलेल्या अन्य शासकीय कार्यालयांना जागा वाटप करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुषंगाने आता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

शासन निर्णय :-

सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, रायगड व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, बेलापूर यांचे कार्यालयास कोकण भवन इमारतीमध्ये सद्य:स्थितीत रिक्त असलेल्या जागा विचारात घेऊन तसेच, विभागीय आयुक्त कोकण विभाग कार्यालयाकडे जागेची मागणी करण्यात आलेल्या अन्य शासकीय कार्यालयांना खालीलप्रमाणे जागा वाटप करण्यात येत आहे :-

१) मुख्य अभियंता, (राष्ट्रीय महामार्ग) सार्वजनिक बांधकाम विभाग यांना कक्ष क्र. ५२४ ची ८४९ चौ.फूट जागा तसेच, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी कक्ष क्र. ५२२ व ५२३ (२५६३ चौ.फूट) मध्ये ठेवलेला अभिलेख इतरत्र हलवून सदर जागा रिक्त केल्यानंतर कक्ष क्र.५२२ व ५२३ च्या एकूण २५६३ चौ.फूट जागेपैकी (कक्ष क्र. ५२४ लगतची) १२१० चौ.फूट जागा अशी एकूण २०५९ चौ. फूट जागा वाटप करण्यात येत आहे. अशाप्रकारे मुख्य अभियंता, (राष्ट्रीय महामार्ग) सार्वजनिक बांधकाम विभाग यांना यापूर्वी त्यांच्या ताब्यात असलेली २१७८ चौ.फूट व नव्याने वाटप करण्यात येणारी २०५९ चौ.फूट अशी एकूण ४२३७ चौ.फूट जागा वाटप करण्यात येत आहे.

२) सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांना ५ वा मजल्यावरील कक्ष क्र.५२२ व ५२३ च्या एकूण २५६३ चौ.फूट जागेपैकी उर्वरित १३५० चौ.फूट जागा वाटप करण्यात येत आहे. सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांनी त्यांच्या त्याब्यातील ६ व्या मजल्यावरील ११०० चौ.फूट जागा रिक्त करुन द्यावी.

३) सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांनी ६ व्या मजल्यावरील ११०० चौ.फूट जागा रिक्त केल्यानंतर सदर ११०० चौ.फूट जागा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, बेलापूर यांना वाटप करण्यात येत आहे.

४) सहायक संचालक, नगररचना मुल्यांकन कोंकण, ठाणे यांना राज्य सरकारी कर्मचारी संघटनेने रिक्त केलेली २ रा मजला, कक्ष क्र. २१४ च्या एकूण ८१४ चौ.फूट जागेपैकी ६०० चौ.फूट जागा वाटप

करण्यात येत आहे. अशाप्रकारे सहायक संचालक, नगररचना मुल्यांकन कोंकण, ठाणे यांना यापूर्वी त्यांच्या ताब्यात असलेली ९४६ चौ.फूट व नव्याने वाटप करावयाची ६०० चौ.फूट अशी एकूण १५४६ चौ.फूट जागा वाटप करण्यात येत आहे.

५) शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना, महाराष्ट्र राज्य या संघटनेस २ रा मजला, कक्ष क्र. २१४ च्या एकूण ८१४ चौ.फूट जागेपैकी सहायक संचालक, नगररचना मुल्यांकन कोंकण, ठाणे यांना वाटप केलेली ६०० चौ.फूट जागा सोडून उर्वरित २१४ चौ.फूट जागा वाटप करण्यात येत आहे.

६) उपायुक्त, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, ठाणे यांचे कार्यालय कोकण भवन इमारतीमध्ये तळमजल्यावर असल्याकारणाने तळमजल्यावरील ५०० चौ.फूट जागा त्यांना वाटप करण्यात येत आहे. अशाप्रकारे उपायुक्त, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, ठाणे यांना यापूर्वी त्यांच्या ताब्यात असलेली १९६५ चौ.फूट व नव्याने वाटप करावयाची ५०० चौ.फूट अशी एकूण २४६५ चौ.फूट जागा वाटप करण्यात येत आहे.

२. उप आयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कोकण विभाग यांनी उपरोक्त जागेचा ताबा संबंधितांना द्यावा व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०११५३६३८६५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pradnya Prakash Sawant

Digitally signed by Pradnya Prakash Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=dcab5c13648ccfdd9424ee4584da4e72f3f6f06dfd6b1eaa220fc9de68f36473, cn=Pradnya Prakash Sawant
Date: 2019.08.01 15:41:37 +05'30'

(प्र. प्र. सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सर्व सन्माननीय विधानसभा/परिषद व संसद सदस्य
२. मा.सभापतींचे सचिव/मा.अध्यक्षांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधान मंडळ, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिवांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
५. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
९. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, सिडको भवन, ५ वा मजला, दक्षिण विंग, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.

११. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, कामगार भवन, ५ वा मजला, सी-२०, ब्लॉक-ई, रिझर्व्ह बँकेच्यासमोर, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
१२. सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, खोली क्र. ६२७, कोकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
१३. मुख्य अभियंता (राष्ट्रीय महामार्ग), सार्वजनिक बांधकाम विभाग, खोली क्र.५२६, ५ वा मजला, कोकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
१४. सहायक संचालक, नगररचना मूल्यांकन कोंकण, ठाणे, खोली क्र. २१३, २ रा मजला, कोकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
१५. विभागीय अध्यक्ष, शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना, खोली क्र. ३०५, ३ रा मजला, कोकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
१६. उपायुक्त, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, ठाणे, खोली क्र. ९ व १०, तळ मजला, कोकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
१७. उप आयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कोकण विभाग, कोकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
१८. सह सचिव (का.२२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१९. निवडनस्ती.